महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
**मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प विभागीय अंमबजावणी कक्ष**
**कार्यालय:- विभागीय कृषि सह संचालक, छत्रपती संभाजीनगर,**
**चेतना मंगल कार्यालय (रामायणा कल्चरल हॉल), ओंकारेश्वर चौक, उल्कानगरी, छत्रपती संभाजीगर – ४३१००९**
**दुरध्वनी क्रमांक** : ०२४०-२३३१०९४ **ई मेल** : aurangabad.riu.smart@gmail.com

**जाक्र/स्मार्ट/ 845 /२०२५** **दिनांक:२२/१२/२०२५**

**प्रति,**

**नोडल अधिकारी**
**जिल्हा अंमलबजावणी कक्ष,**
**स्मार्ट प्रकल्प, बीड**

**विषय-** मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत दूसरा अनुदान हप्ता मागणी आणि मशीनरी देयक बाबत,,,,,,

**संदर्भ-**१) या कार्यालयाचे पत्र जा. क्र-८०९ दि- १०/१२/२०२५

२) ZENITH ENGINEERING यांचा या कार्यालयास प्राप्त मेल दि-२२/१२/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून व्यंकटरामना शेतकरी उत्पादक कंपनी जिल्हा बीड यांना स्मार्ट प्रकल्पामधून अंतिम मंजुरी प्राप्त झालेली असून त्यांना दिनांक २८/०१/२०२५ रोजी प्रथम अनुदान हप्ता प्राप्त झाला आहे. संदर्भ क्रमांक १ नुसार बीड जिल्ह्यातील व्यंकटरामना शेतकरी उत्पादक कंपनी जिल्हा बीड यांच्या समवेत ज्या समुदाय आधारित संस्थेने द्वितीय अनुदान हप्ता मागणी या कार्यालयास सादर केली नाही अशा समुदाय आधारित संस्थांना तात्काळ द्वितीय अनुदान हप्ता मागणी या कार्यालयास सादर करण्याबाबत कळवले होते. मात्र अद्याप देखील व्यंकटरामना शेतकरी उत्पादक कंपनी जिल्हा बीड यांचा दुसरा अनुदान हप्ता मागणी प्रस्ताव या कार्यालयास अप्राप्त आहे.

संदर्भ क्रमांक २ नुसार व्यंकटरामना शेतकरी उत्पादक कंपनी जिल्हा बीड यांना पूर्ण पाने स्वयंचलित स्वच्छता व प्रतवारी मशीन (४ टन प्रती तास) पुरवठा केलेल्या जेनीत इंजीनियरिंग या पुरवठादाराने मशीन बसवल्यानंतर अदा करण्याची 50 % रक्कम अद्याप देखील त्यांना न मिळाल्याचे या कार्यालयास मेलद्वारे कळवले आहे म्हणून आपणास सूचित करण्यात येते की तात्काळ द्वितीय अनुदान हप्ता मागणी या कार्यालयास सादर करण्यास व्यंकटरामना शेतकरी उत्पादक कंपनी जिल्हा बीड यांना अवगत करावे, जेणेकरून जेनीत इंजिनिअरिंग यांचे उर्वरित देयक त्यांना अदा करणे शक्य होईल.

**नोडल अधिकारी ,**
**विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प**
**छत्रपती संभाजी नगर**

**प्रत,**

१) मा.प्रकल्प संचालक , स्मार्ट प्रकल्प , पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प , बीड यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेशीत.
४) व्यंकटरामना शेतकरी उत्पादक कंपनी जिल्हा बीड यांना उचित कार्यवाहीस्तव
५) ZENITH ENGINEERING यांना मेल द्वारे माहितीस्तव

C:\Users\HP\Desktop\१७.१२\RIU Letter Head.docx